# 2017-18

| Sr. No. | Name of the teacher | Title of the book / chapters published | Title of the paper | | Year of publication | ISBN number of the proceeding | Affiliating Institute at the time of publication | Name of the publisher |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Dr. Bodgire V.S. | Shivrath | Sangli Jilyatil Takari-Mhyshal Upsa Jal Sichan Yojana | Sangli Jilyatil Takari-Mhyshal Upsa Jal Sichan Yojana | 2017-18 | 978-81-907287-8-2 | Arts and Commerce College, Mayani | Jain Publication Sangli |
| 2 | Dr. Mirajkar S.B. | Adhunik Bhartache Nirmate : Dr. Babasaheb Ambedkar | Dr. Babasaheb Ambedkaranche Krushichintan | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृ षीचचंतन | 2017-18 | 978-93-84011-84-2 | Arts and Commerce College, Mayani | Lokayat Publication, Satara |
| 3 | Dr. Mirajkar S.B. | Nimitya : Swapnanchya Patzhadinantar | Agagtik Jeevanacha Lekha-Jokha | आगततक जीवनाचा लेखा-जोखा | 2017-18 | 978-93-85154-03-04 | Arts and Commerce College, Mayani | Nadkatti Prakashan, Dharwad |
| 4 | Dr. Mokashi S.A. | Pharman aani itr kavita (aashay) | Samaj Vastavteche dolas bhan asnari kavita | समाज वास्तवतेचे डोळस भान असणारी कविता | 2017-18 | 978-93-87129-30-6 | Arts and Commerce College, Mayani | Athrav Publication |
| 5 | Dr. Mokashi S.A. | माराष्ट्रातील लेको चळवळी | - | - | 2017-18 | 978-73-82451-69-3 | Arts and Commerce College, Mayani | Naga-Nalanda Prakashan Islampur |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | Dr. Mirajkar S.B. | Aathwani ani Vyaktitva | Karykrtyachi Aai | Karykrtyachi Aai | 2017-18 | 978-93-82-45-1-66-2 | Arts and Commerce College, Mayani | Naga-Nalanda Prakashan Islampur |
| 7 | Dr. Mirajkar S.B. | Sahityamimansa | Sant Sahityacha Samajshatriy Drushtikonatun Abhyas | संत साहित्याचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातुन अभ्यास | 2017-18 | 978-93-85527-86-9 | Arts and Commerce College, Mayani | Shabdalay Prakashan, Srirampur |
| 8 | Dr. Mokashi S.A. | Maharashtratil Lok chalvali | Shetkari Sahitya Irjikachi Chalval | शेतकरी साहित्य इर्जिकची चळवळ | 2017-18 | 978-93-82451-69-3 | Arts and Commerce College, Mayani | Naga-Nalanda Prakashan Islampur |
| 9 | Dr. Mirajkar S.B. | Hindi Aur Marathi Sahitya Ki Samajprabodhan Me Bhumika | Varkari Santsahitya, Nirgunvad ani Samajprabodhan | वारकरी संतसाहित्य, निर्गुणवाद आणि समाज प्रबोधन | 2017-18 | 978-81-934308-5-9 | Arts and Commerce College, Mayani | L.B.S. College |

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर संलग्नीत
गांधी एज्यूकेशन सोसायटी, कुंडलचे

# क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालय, कुंडल

ता. पलूस, जि. सांगली

अर्थशास्त्र विभाग आयोजित

ISBN No: 978-81-907287-8-2

2017-18



# शिवार्थ स्मरणिका २०१८



१) सहकारी अर्थकारण- काल, आज आणि उद्या

२) पद्मभूषण डॉ. वसंतदादा पाटील यांचे महाराष्ट्राच्या विकासातील योगदान

शिवाजी युनिव्हर्सिटी
इकॉनॉमिक्स असोसिएशन, कोल्हापूर (सुयेक)

## २८ वे वार्षिक अधिवेशन

शुक्रवार दि. ०५ जानेवारी व ०६ जानेवारी २०१८

# शिवार्थ स्मरणिका २०१८

ISBN -978-81-907287-8-2

प्रकाशन स्थळ :
**क्रांतिअग्रणी जी.डी.बापू लाड महाविद्यालय,कुंडल**

प्रकाशन काळ :
**वार्षिक**

मुद्रक :
**लक्ष्मी प्रिंटींग प्रेस, कुंडल**
मु. पो. कुंडल, ता. पलूस, जि. सांगली
फोन नं : (०२३४६) २७१२४६

प्रकाशकाचे नांव :
**जैन सिध्दांत पब्लिकेशन सांगली ४१६४१६**

संपादकाचे नांव :
**प्राचार्य, डॉ. व्ही. ए. पाटील**
आर्टस् ॲण्ड सायन्स कॉलेज, सांगली

प्रकाशन :
**शुक्रवार, दि. ५ जानेवारी २०१८**

या अंकातील शेधनिबंधात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# अनुक्रमणिका


◆ डॉ. पद्मभूषण वसंतरावदादा पाटील यांचे महाराष्ट्राच्या विकासातील योगदान
- प्रा. संजय ठिगळे (१५७)

◆ प्रगत महाराष्ट्राचे शिल्पकार: पद्मभूषण डॉ. वसंतदादा पाटील
- डॉ. सौ. ऋतुजा कुलकर्णी (१६४)

◆ भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील वसंतदादांचे योगदान
- डॉ. जयवंत इंगळे (१७०)

◆ डॉ. पद्मभूषण वसंतरावदादा पाटील यांचे महाराष्ट्राच्या विकासातील योगदान
- प्रा. दत्तात्रय होनमाने (१७८)

◆ महाराष्ट्राच्या सहकारी चळवळीतील प्रणेते: वसंतरावदादा पाटील
- डॉ. रामलिंग नाळे (१८५)

◆ नवमहाराष्ट्राच्या निर्मितीत पद्मभूषण डॉ. वसंतदादा पाटील यांच्या कार्याचा अभ्यास
- श्री. चंद्रकांत भोसले (१९०)

◆ लोकहितकारक राजकीय व्यक्तिमत्त्व: वसंतदादा पाटील
- डॉ. विजय पाटील आणि प्रा. नागेश चंदनशिवे (१९३)

◆ पद्मभूषण डॉ. वसंतदादा पाटील यांचे सांगली जिल्ह्याच्या अर्थकारणातील योगदान
- कु. प्रतिक्षा पाटील (१९६)

◆ ग्रामीण विकासाचा शिल्पकार: पद्मभूषण डॉ. वसंतदादा पाटील
- प्रा. जालींदर यादव (२००)

◆ सांगली जिल्ह्यातील ताकारी - म्हैसाळ उपसा जलसिंचन योजनेतील डॉ. वसंतदादा पाटील यांचे योगदान
- प्रा. विलास बोदगिरे आणि डॉ. शिवाजी भोसले (२०६)

◆ पद्मभूषण डॉ. वसंतदादा पाटील: एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व
- प्रा. सौ. एन. एस. पाटील (२१५)

◆ सहकार विषयक वसंतरावदादा पाटील यांचे विचार
- प्रा. के. एस. पाटील आणि डॉ. बी. जे. कदम (२२१)

# ‘सांगली जिल्हयातील ताकारी-म्हैसाळ उपसा जलसिंचन योजनेतील डॉ. वसंतदादा पाटील यांचे योगदान

**प्रा. विलास बोदगिरे**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, कला, वाणिज्य महाविद्यालय, मायणी,
ता. खटाव, जि. सातारा.

**प्रा. डॉ. भोसले शिवाजी मुरलीधर**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा.

**प्रस्तावना**

पश्चिम महाराष्ट्रातील एक अग्रगण्य जिल्हा म्हणून सांगली जिल्ह्याचा उल्लेख केला जातो. सन १९४९ मध्ये सातारा जिल्ह्याचे विभाजन होऊन दक्षिण सातारा हा नवीन जिल्हा उदयास आला. त्याचे पुढे नामांतर होऊन २१ नोव्हेंबर, १९६० रोजी सांगली जिल्हा म्हणून तो ओळखला जाऊ लागला. हा जिल्हा दहा तालुक्यामध्ये विभागला आहे. जिल्ह्यात एकूण ७३२ गावांचा समावेश असून २०११ च्या जनगणना नुसार जिल्ह्याची एकूण लोकसंख्या २८ लाख २० हजार ५७५ इतकी आहे. सांगली जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ ८६०१.५ चौ. कि. मी. असून भौगोलिक क्षेत्रफळाच्या दृष्टीने सांगली जिल्ह्याचा महाराष्ट्रात २१ वा क्रमांक लागतो आणि लोकसंख्येच्या बाबतीत १५ वा क्रमांक लागतो.

२१ नोव्हेंबर, १९६० रोजी सांगली जिल्हा अस्तित्वात आल्यानंतर राज्यातील आर्थिक, सामाजिक, राजकीय व सहकारी चळवळीच्या दृष्टीने राज्यात सांगलीचा एक वेगळाच ठसा उमटू लागला. राज्यामध्ये सांगली जिल्ह्याला अग्रेसर बनविण्यासाठी अनेक क्रांतिकारक व थोर नेत्यांनी माठ्या प्रमाणात प्रयत्न केले. प्रामुख्याने त्यामध्ये क्रांतिसिंह नाना पाटील, यशवंतराव चव्हाण, नागनाथआण्णा नायकवडी, क्रांतिअग्रणी जी. डी.

बापू लाड, वि. स. पागे, धोंडीराम बापू माळी यांचा उल्लेख करावाच लागतो. तसेच विकासाच्या दृष्टीने देखील डॉ. वसंतदादा पाटील व राजारामबापू पाटील यांचे योगदान मोठे आहे. त्यामुळे जिल्ह्याच्या कृषी, औद्योगिक, शैक्षणिक व सहकार क्षेत्राच्या जडणघडणीत डॉ. वसंतदादा पाटील यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. कारण चौथी पास असणारी व्यक्ती ४ वेळा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होवून संपूर्ण राज्यात विविध क्षेत्रात क्रांती घडवू शकते ही बाब निश्चितच जिल्हयाच्या दृष्टीने भूषणावह मानावी लागेल. सन २०१७ हे वर्ष डॉ. वसंतदादा पाटील यांचे जन्मशताब्दी वर्ष म्हणून साजरे करीत असताना त्यांच्या कार्याची नवीन पिढीला व समाजाला ओळख व्हावी या हेतूने हा शोधनिबंध लिहिण्याचा अल्पसा प्रयत्न आम्ही केलेला आहे.

**अभ्यासाचे क्षेत्र**

प्रस्तुत शोध निबंधामध्ये डॉ. वसंतदादा पाटील यांनी मंजूर केलेल्या सांगली जिल्ह्यातील ताकारी-म्हैसाळ योजनांचे लाभ क्षेत्र अभ्यासासाठी निवडले आहे. त्यामध्ये ताकारीसाठी कडेगाव, खानापूर, तासगाव, वाळवा आणि पलूस या तालुक्यातील ६१ गावांचा अभ्यास तसेच म्हैसाळ योजनेसाठी मिरज, कवठेमहांकाळ, तासगाव, जत, सांगोला आणि मंगळवेढा या तालुक्यातील १७७ गावांचा समावेश अभ्यास क्षेत्रासाठी करण्याचा प्रयत्न केला आहे.

**अभ्यासाची उद्दिष्टे**

१) सांगली जिल्ह्यातील जलसिंचनातील डॉ. वसंतदादा पाटील यांचे योगदान अभ्यासणे.
२) सांगली जिल्ह्यातील ताकारी, म्हैसाळ उपसा जलसिंचन योजनांचा अभ्यास करणे.
३) सिंचन क्षेत्रातील लाभ क्षेत्राचा अभ्यास करणे.
४) ताकारी, म्हैसाळ उपसाजलसिंचन योजनांची सद्य:स्थिती व समस्याचा अभ्यास करणे.
५) उपसा जलसिंचन योजना यशस्वीतेसाठी शिफारशी सुचविणे.

**माहिती संकलन स्त्रोत**

प्रस्तुत शोध निबंध हा प्रामुख्याने प्राथमिक आणि दुय्यम साधन सामग्रीवर आधारलेला आहे. या निबंधात महाराष्ट्रातील आर्थिक पहाणीतील आकडेवारी, महाराष्ट्र जलसिंचनाचे खंड, संदर्भ ग्रंथ, नियतकालिके, दूरचित्रवाहिकेतील चर्चा, वर्तमानपत्रातील विविध लेख तसेच कृष्णा खोरे अंतर्गत कार्यालयाकडील विविध अहवाल इ. आधारावर प्रस्तुत शोध निबंध मांडला आहे.

**अभ्यास पद्धती**

प्रस्तुत शोध निबंधामध्ये डॉ. वसंतदादा पाटील यांचे जिल्ह्याच्या शेती व ग्रामीण विकासामधील तसेच उपसा जलसिंचन योजनांमधील कार्याचा आढावा घेण्याचा मुख्य हेतू यामध्ये आहे. सांगली जिल्ह्यातील ताकारी, म्हैसाळ उपसा जलसिंचन योजनेच्या सद्य:स्थितीचा, प्रगतीचा आणि समस्यांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे. 'सांगली जिल्ह्यातील ताकारी, म्हैसाळ या उपसा जलसिंचन योजनांच्या प्रगतीचा आढावा घेणे हे या अभ्यासाचे गृहीतक मानले आहे. त्या अनुषंगाने या दोन्ही प्रकल्पाच्या कार्यक्षेत्रातील लाभ क्षेत्र, अपेक्षित खर्च, प्रत्यक्ष झालेला खर्च यातून काही निवडक माहिती घेण्यात आली आहे.

**कृष्णा खोरे विकास महामंडळ – ध्येय व धोरण**

युती सरकारच्या काळात १ एप्रिल, १९९६ रोजी महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ स्थापन झाले. कृष्णा पाणी तंटा लवादाच्या निर्णयाच्या अनुशंगाने महाराष्ट्राच्या वाट्यास आलेले ५९५ टी.एम.सी. पाणी उचलण्यास परवाना मिळाल्यानंतर मोठे, मध्यम आणि लघु पाटबंधारे प्रकल्प पूर्ण करण्याचा प्रयत्न झाला.

**सांगली जिल्ह्यातील ताकारी–म्हैसाळ उपसा जलसिंचन प्रकल्प**


| अ.नं. | प्रकल्पाचा तपशील | ताकारी प्रकल्प | म्हैशाळ |
|---|---|---|---|
| १ | योजनेची सुरूवात | १९८४ | १९८६ |
| २ | लाभ क्षेत्रातील गावे | ६१ | १७७ |
| ३ | लाभ क्षेत्रातील तालुके | ०६ | ०६ |
| ४ | सिंचनाचे उद्दिश्ट | २७४३० हे. | ८१७९१ हे. |
| ५ | सध्याचे सिंचन क्षेत्र | १६९६४ हे. | ३३७५१ हे. |
| ६ | मूळ किंमत (कोटी रु.) | ८२.४३ | ८३ |
| ७ | सध्याची किंमत (कोटी रु.) | ६८४.५५ | १३२१.१२ |
| ८ | आतापर्यंत झालेला किंमत (कोटी रु.) | ५५६.७४ | १०८३.८५ |
| ९ | योजना पूर्ण करण्यास लागणारा निधी | २५० | १३८१.१२ |
| १० | योजनेची एकूण वर्शे | ३३ वर्शे | ३१ वर्शे |

संदर्भ: ताकारी–म्हैसाळ संक्षिप्त टिपणी, २०१५

वरील पत्रकारून सांगली जिल्ह्यातील ताकारी–म्हैसाळ योजनेच्या प्रगतीचा लेखाजोखा पुढे येतो. ताकारी सिंचन प्रकल्पापेक्षा म्हैसाळ योजनेची व्याप्ती खूप मोठी वाटते. तसेच पत्रकावरून मूळ किंमतीपेक्षा प्रत्यक्षात या दोन्ही योजनांवर खर्च कमी झाल्याचे दिसून येते. तसेच सिंचनाचे उद्दिष्टसुद्धा ताकारी केवळ २७४३० हेक्टर असून म्हैसाळ योजनेचे सिंचन उद्दिष्ट ८१७९१ हेक्टर इतके आहे. म्हणजेच ताकारीपेक्षा म्हैसाळ योजना जवळजवळ तिप्पट मोठी आहे. ताकारी योजनेच्या मूळ किंमतीपेक्षा ३३ वर्षात जवळजवळ आठपट खर्च वाढला आहे.

**ताकारी योजना**

ताकारी योजना ही सांगली जिल्ह्यातील पहिली मोठी उपसा जलसिंचन योजना आहे. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतदादा पाटील यांनी या योजनेला प्रशासकीय मान्यता दिली. ताकारी योजनेची सुरुवात १९८४ मध्ये झाली. प्रामुख्याने कडेगाव, खानापूर, तासगाव, वाळवा व पलूस इ. तालुक्यांमधील जवळपास ५५ गावातील जमीन पाण्याखाली येत आहे. या योजनेमध्ये एकूण २७४३० हे. सिंचनाचे उद्दिष्ट आहे. त्यापैकी सध्या ५५६० हे. क्षेत्र भिजले आहे. ताकारी योजनेची मूळ किंमत ८२.४३ कोटी रुपये इतकी आहे व सध्याची या प्रकल्पाची किंमत वाढून ६८४.५५ कोटी रुपये झाली आहे. या योजनेवर आतापर्यंत ५५६.७४ कोटी इतका खर्च


डॉ.बाबासाहेब
आंबेडकरांचे
कृषिचिंतन
संपादक
डॉ.माधव जाधव

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे कृषिचिंतन
संपादक – डॉ.माधव जाधव

DR.BABASAHEB AMBEDKARANCHE KRUSHICHINTAN
SAMPADAN - DR. MADHAV JADHAV


प्रथमावृत्ती : ११ एप्रिल २०१८ (महात्मा फुले जयंती)



सर्व हक्क : ©डॉ.माधव जाधव



ISBN : 978-93-84091-84-2

प्रकाशक : राकेश आ. साळुंखे, B.E.
लोकायत, १३ यशवंतनगर,
गेंडामाळ, सातारा - ४१५ ००२.
दूरध्वनी : (०२१६२) २५०७२५/२५२७८८

अक्षरजुळणी : सुदर्शन अग्रवाल व
विजयकुमार चित्तरवाड, नांदेड

मुद्रक व मुखपृष्ठ : कलाविष्कार ग्राफिक्स्, सातारा
मोबा.९८६०९६३७०८

मूल्य : रूपये २२०/-


---


या ग्रंथातून व्यक्त झालेली मते ही त्या-त्या लेखकांची असून संपादक व प्रकाशक या मताशी सहमत असतीलच असे नाही.

# अनुक्रमणिका


**विभाग पहिला :- आर्थिक विचार**

१) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार — १०
-डॉ.जनार्दन वाघमारे

२) डॉ.आंबेडकरांच्या अर्थचिंतनाची व्यापकता — २६
-प्रा.यादव गायकवाड

**विभाग दुसरा :-जल व ऊर्जानीती**

१) ऊर्जा व पाटबंधारेमंत्री : डॉ.बाबासाहेब आंबेडकर — ३८
-प्रा.रविचंद्र हडसनकर

२) ऊर्जा आणि जलनियोजनाचे शिल्पकार : डॉ.बाबासाहेब आंबेडकर — ४१
-डॉ.प्रकाश मोगले

३) जल व कृषितज्ज्ञ : डॉ.बाबासाहेब आंबेडकर — ४७
-ॲड.राजेंद्र लातूरकर

**विभाग तिसरा :- कृषिचिंतनाचे विविध पैलू**

१) आधुनिक भारताची पायाभूत बांधणी आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर — ५६
-प्रा.राजीव के.आरके

२) कृषिचिंतक डॉ.बाबासाहेब आंबेडकर — ७९
- डॉ.शैलेंद्र लेंडे

३) आधुनिक भारताचे निर्माते : डॉ.बाबासाहेब आंबेडकर — ९५
-डॉ.श्यामसुंदर मिरजकर

४) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे कृषिविषयक विचार — १०२
-प्रा.जैमिनी कडू

५) डॉ.आंबेडकरांची शेतीविषयक भूमिका — ११२
-डॉ.अविनाश फुलझेले

६) भारतीय शेतीचे प्रश्न आणि डॉ.आंबेडकरांचे विचार
-डॉ.रूपेश कऱ्हाडे

७) भविष्याचा वेध घेणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे कृषिचिंतन — १३३
-डॉ.माधव जाधव

# ३. आधुनिक भारताचे निर्माते : डॉ.बाबासाहेब आंबेडकर

- डॉ.श्यामसुंदर मिरजकर

विसाव्या शतकात जगाला प्रभावित करणारा विचारप्रवाह म्हणजे आधुनिकतावाद (Modernism) होय. आधुनिक ही मूल्यात्मक संकल्पना आहे. जेव्हा आपण एखादी व्यक्ती आधुनिक (Modern) आहे, असे म्हणतो तेव्हा त्याचा अर्थ, तिने आधुनिक पोशाख किंवा राहणीमान स्वीकारले आहे, असा नसून; विचारांच्या पातळीवर तो प्रागतिक अशी नवी मूल्ये स्वीकारणारा आहे, असा होतो. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संपूर्ण देशालाच 'आधुनिक' बनवण्यासाठी कोणते योगदान दिले, ते आपण येथे पाहणार आहोत.

आज डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा जयघोष करणारे लोक तीन गटांत विभागले आहेत. काही लोक स्वतःला डॉ.आंबेडकरांच्या जातीचे किंवा धर्माचे असल्यामुळे आंबेडकरवादी म्हणवतात. काही लोक राजकीय स्वार्थापोटी डॉ.आंबेडकरांचे नाव सातत्याने घेतात, तर काही लोक डॉ.आंबेडकरांचे विचार व कार्य यांच्या परिशीलनाने स्वतःला आंबेडकरांचे चाहते व अनुयायी म्हणवतात. आज तिसऱ्या गटातील लोकांची समाजाला नितांत आवश्यकता आहे.

'आधुनिक संस्कृतीमध्ये तीन महत्त्वाची गृहीतके स्वीकारण्यात आली आहेत. एक, मानवामध्ये सारतत्त्व (essence) आहे व ते विवेकशीलता (rationality) हे आहे. दोन, विज्ञान व वैज्ञानिक दृष्टिकोन यामुळे वस्तुनिष्ठ सत्याचा शोध घेता येईल. तीन, सर्वव्यापी सार्वत्रिक अशी काही नीतिमूल्ये आहेत.'

आधुनिकतेची जडणघडण या गृहीतकांवर आधारलेली आहे. भारतात वेशभूषा, केशभूषा, राहणीमान, कृषी आणि इतर क्षेत्रांतील तंत्रज्ञानाचा स्वीकार, विज्ञानाचा स्वीकार, परखड बुद्धिनिष्ठ चिकित्सा, धर्म व परंपरांचे मूल्यमापन, शिक्षणाची किमान पातळी, सामाजिक संकेतांची पुनर्मांडणी यांना आधुनिकतेच्या संदर्भात खूप महत्त्व आहे.

डॉ.आंबेडकर हे त्यांच्या काळातल्या अतिशय बुद्धिमान व्यक्तींपैकी एक होते. स्थळ-काळाच्या पलीकडे जाऊन समाज व देशाचा विचार करण्याचे द्रष्टेपण त्यांच्याकडे होते. म्हणूनच ते एकाच वेळी अनेक स्तरांवर, अनेक

केले. त्यातूनच पुढे महानदी, कोसी, सोननदी आणि इतर सर्व प्रकल्प तयार झाले. या संदर्भात बहुउद्देशीय आणि प्रादेशिक विकासाचे प्रकल्प ज्यांनी तयार केले त्या डॉ.बी.आर.आंबेडकर यांचे आपण सर्वांनी ऋणी असले पाहिजे."[३]

१९४२ ते ४६ या चार वर्षात डॉ.आंबेडकरांनी देशाच्या सर्वांगीण विकासाचा पाया रचला. ऊर्जा, जल, उद्योग आणि कामगार अशा आजच्या चार मंत्रालयांची कामे डॉ.आंबेडकर एकटे करीत होते. ते सचिव आणि अधिकाऱ्यांवर विसंबून असणारे मंत्री नव्हते. तर प्रशासकीय कामकाज, अभ्यासाबरोबरच त्यांनी स्वतः झपाटून काम केले आणि हाताखालच्या नोकरशाहीला करायला भाग पाडले. त्यामुळेच बिहार व बंगालच्या दामोदर खोरे विकासाचा पुढे पथदर्शी ठरलेला प्रकल्प त्यांच्या काळात यशस्विरित्या कार्यान्वित झाला. शेती आणि पिण्यासाठी पाणी आणि उद्योगासाठी स्वस्त व मुबलक वीज याचे महत्त्व समजलेले मंत्री प्रारंभीच्या काळात मिळाले. म्हणूनच भारताची वाटचाल आधुनिकतेकडे होऊ शकली.

**कायदामंत्री डॉ.आंबेडकर**

स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री म्हणून डॉ.आंबेडकरांनी १९४७ ते १९५१ या कालखंडात काम केले. या काळात त्यांनी भारतीय स्त्रियांची सामाजिक स्थिती सुधारावी म्हणून 'हिंदू कोड बिल' संसदेत सादर केले. परंतु कॉंग्रेसच्या पारंपरिक विचारसरणीच्या नेत्यांनी ते मंजूर होऊ दिले नाही. परिणामी २७ सप्टेंबर १९५१ रोजी त्यांनी आपला राजीनामा पंतप्रधान नेहरूंकडे पाठविला. त्यांनी तो १० ऑक्टोबर १९५१ रोजी मंजूर केला. त्या राजीनामापत्रात त्यांनी आपल्या राजीनाम्याची चार प्रमुख कारणे सांगितली होती. त्यातील एक हिंदू कोड बिल न स्वीकारणे हे होते. तर दुसरे, इतर मागासवर्ग निश्चित करण्यासाठी ३४० कलमांतर्गत आयोग न नेमणे आणि त्यांना घटनात्मक संरक्षण न देणे हे होते म्हणजेच स्त्रिया आणि ओबीसी यांच्या हक्कांसाठी राजीनामा देणारे ते पहिले आणि एकमेव मंत्री होते.

डॉ.आंबेडकरांचे विचार आणि मागण्या कालांतराने कॉंग्रेसला स्वीकाराव्याच लागल्या. कारण देशाची निम्मी लोकसंख्या असणाऱ्या स्त्रिया आणि ५२% लोकसंख्या असणारे ओ.बी.सी.यांना त्यांचे न्याय्य हक्क व अधिकार देऊन त्यांना सक्षम करणे हेच देशाच्या विकासासाठी गरजेचे आहे हे कॉंग्रेसला पटले होते. आज ज्या गतीने स्त्रिया व ओबीसी सर्व क्षेत्रांत पुढे येत

आहेत, त्याची धोरणात्मक आखणी डॉ.आंबेडकरांनी केली होती, याची प्रचिती राज्यघटना व 'शूद्र पूर्वी कोण होते?' या ग्रंथातून आल्याशिवाय राहत नाही.

**बुद्धांचा पुनर्शोध**

डॉ.आंबेडकरांनी जगाला नव्याने गौतम बुद्ध या महान दार्शनिकाचा परिचय करून दिला. धर्म प्रवाही असला पाहिजे, तसा तो कालसुसंगत असला पाहिजे, असे सांगणारे बुद्ध हे ऐहिक मानवी जीवन दुःखमुक्त करू पाहणारे दार्शनिक होते. डॉ.आंबेडकरांनी आपल्या अनुयायांसह लाखोंच्या संख्येने बौद्ध धम्मात प्रवेश केल्यामुळे सनातनी हिंदूंना आपला धर्म परखडपणे तपासावा लागला. फुले-आंबेडकरांची धर्मचिकित्सा मानवतावादाला, विवेकवादाला प्रमाण मानून पुढे जाणारी होती. आज देशात चिकित्सक वृत्ती, धर्मनिरपेक्षता आणि निरीश्वरवाद वाढतो आहे, त्याचे मूळ फुले-आंबेडकरांच्या विचारात आहे. आज बुद्धांचे तत्त्वज्ञान आधुनिक मूल्यदृष्टीला कालसुसंगत वाटते. डॉ.आंबेडकरांचे 'बुद्ध आणि त्याचा धम्म' ही संपूर्ण जगाला महत्त्वाची देणगी असे म्हणता येते.

अशा प्रकारे आधुनिक भारताच्या जडणघडणीत अनेक पातळ्यांवर डॉ.आंबेडकरांनी दिलेले योगदान महत्त्वपूर्ण आहे. त्यांच्या विचारांच्या प्रकाशात आधुनिक भारताची वाटचाल आत्मविश्वासाने होते आहे, त्याबद्दलची कृतज्ञता त्यांच्या १२५ व्या जयंतीप्रसंगी आपण व्यक्त केली पाहिजे.

**संदर्भ :**


१) गोखले, प्रदीप : अन्वीक्षण त्रैमासिक, पुणे, वर्ष १, अंक ४, एप्रिल ते जून २०११, पृ.९

२) आंबेडकर, डॉ.बाबासाहेब : डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे-भाग २, महाराष्ट्र शासन, २००२, पृ.४२६-२७

३) नरके, हरी : अन्वीक्षण, उक्त, पृ.४६


* * *

# निमित्त :
# स्वप्नांच्या पडझडीनंतर...



संपादक : डॉ. यशवंत राऊत

पडझडीच्या काळातही लय जपणारा कवी • नीलेश शेळके / ७७
स्वप्नमोळीचे बांधकाम • प्रा. डॉ. रमेश साळुंखे / ८३
अस्वस्थ प्रश्नांचा गुंता • प्रा. डॉ. माधव भोसले / ८८
अगतिक जीवनाचा लेखाजोखा • प्रा. डॉ. श्यामसुंदर मिरजकर / ९६
अनुभवाचा तळ शोधणारी कविता • अंजली कुलकर्णी / ९९
मातीशी इमान राखणाऱ्या कविता • प्राचार्य डॉ. जी. पी. माळी / १०३
हरवल्या हुरहुरींची उत्कटता • डॉ. कैलास दौंड / १०६
वर्तमानातलं अस्वस्थ जगणं • प्रा. डॉ. विनोद कांबळे/ १०९
जीवनाबद्दलचे गंभीर भाष्य • संजय बोरुडे / ११२
चिंतनगर्भ कवितांचे जग • प्रा. डॉ. पांडुरंग भोसले / ११५
अस्वस्थ करणारी अस्वस्थ कविता • डॉ. श्रीराम पचिंद्रे / ११९
जागतिकीकरणात हरवल्या गावाची पायवाट शोधणारी कविता • डॉ. सुनील जवंजाळ / १२५
स्वप्नांच्या पडझडीनंतर...'मधील भावांदोलने • प्रा. डॉ. गिरीश मोरे / १२९
स्वप्नांच्या पडझडीनंतरही ! • डॉ. अ. रा. यार्दी / १३५
गाय, माणसं आणि मातीच्या शोधाची कविता • प्रा. अरुण शिंदे / १३९

# अगतिक जीवनाचा लेखाजोखा

– श्यामसुंदर मिरजकर

कविता म्हणजे संवेदनशील प्रतिभावंताने समकाळाला दिलेली तरल प्रतिक्रिया! कवी नेहमीच अस्वस्थ असतो; कारण भोवतालच्या पर्यावरणात त्याचा श्वास घुसमटतो. जगणे सुंदर, सुगम असावे याबद्दल त्याने पाहिलेली स्वप्ने आणि भयचकित करणारे वास्तव यांचा ताळमेळ बसत नाही; तेव्हा त्याचे अस्वस्थलेपण शब्दांतून मुखर होऊ लागते. याच पठडीतला एक कवी म्हणजे चंद्रकांत पोतदार.

कवी चंद्रकांत पोतदार हा मुळात सौंदर्यवादी प्रवृत्तीचा कवी. ग्रेस व आरती प्रभूंच्या शब्दछायेत त्याची वाटचाल सुरू आहे. जीवनाचे एक स्वप्नाळू कल्पनाचित्र घेऊन कवी वावरतो. ते वास्तवात येत नाही; त्यामुळे पोतदारांची कविता दुःखाच्या हुंदक्यात आरपार बुडालेली दिसते. परंपरागत जीवन व मूल्ये यांचे हरवलेपण, नात्यांमध्ये येणारे कोरडेपण यामुळे जीवन भकास, उदास होत जाते.

कसे विसरावे बाई
दुःख जुने झाले तरी
सोसलेला एक घाव
सदा काळजाच्या उरी

अशी कवीची अवस्था झालेली दिसते. या संग्रहातील कविता बहुसंख्येने आत्मनिष्ठ अनुभवांनी व्यापलेली आहे. नवेपण सरले आहे, पोक्तपण मुरलेले नाही, अशा संधिकाळात कवी उभा आहे.

या उजाड माळावरती
घर कसे, कुणाचे बांधू ?
आयुष्य उतरत्या वेळी
हे नाते कसले सांधू ?

असा कवीसमोरचा प्रश्न आहे.

वर्तमान बदलले आहे. संगणकीकरण, जागतिकीकरण यांनी भावनांचे प्रदेश आखडले गेले आहेत. जगण्याचा खराखुरा अनुवाद कोणालाच शक्य नाही, असे जाणवत राहते. त्यामुळे जगण्याच्या नव्या परिभाषेत व्यक्त होताना कवी म्हणतो,

# फर्मान आणि इतर कविता

15

## आशय आणि आस्वाद

संपादन : तुषार चांदवडकर



- **कवी आंधळे यांची गझल : काही विचार** ........ २३१
  – प्रा. डॉ. किशोर मंगेश पाटील
- **१९९० नंतरची काव्यकृती 'फर्मान'** ........ २४३
  – डॉ. जितेंद्र श्यामसिंग गिरासे
- **ग्रामीण जीवनाशी नाळ जोडणारी उपहासगर्भ कविता फर्मान** .... २४८
  – प्रा. बी. एन. चौधरी
- **समाज वास्तवतेचे डोळस भान असणारी कविता** ........ २५१
  – डॉ. सयाजीराजे अप्पासाहेब मोकाशी
- **फर्मान आणि इतर कविता – एक दृष्टिक्षेप** ........ २५५
  – प्रा. डॉ. बाळासाहेब शंकर शेळके
- **प्रा. वा. ना. आंधळे यांची 'काव्यमुद्रा'** ........ २६४
  – डॉ. अरुण देवरे
- **फर्मान आणि इतर कविता : एक आकलन** ........ २६८
  – प्रा. डॉ. विलास तायडे

**मलपृष्ठावरील 'फर्मान'ची पाठराखण**
  – प्राचार्य डॉ. दिलीप धोंडगे

**लेखक परिचय** ........ २७५


# समाज वास्तवतेचे डोळस भान असणारी कविता

– डॉ. सयाजीराजे अप्पासाहेब मोकाशी

आजच्या नव्या काळात मराठी कवितेची चिकित्सा करणे मोठे अवघड व जोखमीचे काम झालेले आहे. मराठीतील विविध वाङ्मय प्रकारात जेवढे बदल घडले नसतील तेवढे नव्या प्रयोगशीलतेने काव्याच्या प्रांतात घडले. आशय, नवी अभिव्यक्ती, नवी दृष्टी आणि नवी शैली लेवून नवी कविता लघुनियतकालिकांच्या चळवळीनंतर आकारास आली. नव्या कवितेचे अनेक नवे प्रवाह जोरदारपणे मुख्य प्रवाहात मिसळले. त्यामुळे मराठी कवितारूपी सरितेचा प्रवाह एकविसाव्या शतकाच्या पठारावर आल्यानंतर तो खोल आणि अथांग बनला. संथपणा हे त्याच्या प्रगल्भतेचे आणि समृद्धीचे प्रतीक बनले. असे असूनही उदंड लिहिल्या जाणाऱ्या आजच्या कवितेत काही मोजक्याच कविता अन् कवी या शब्द पसाऱ्यात उठून दिसणारे आहेत. 'फर्मान आणि इतर कविता' लिहिणारे प्रा. वा. ना. आंधळे हे यापैकी एक होत.

आजच्या जागतिकीकरणाच्या नव्या युगात माणसाचे जीवन 'वस्तुमय' बनले आहे. वस्तू आणि ग्राहक यांच्यात 'पैसा' महत्त्वाचा ठरला आहे. त्यामुळे संवेदना बधिर होऊन, जगण्याचे असंख्य प्रश्न आज निर्माण झाले आहेत. आटत निघालेला नात्यांचा ओलावा, जन्मदात्यांची प्रतारणा, पैशाला भाळणारे मतदार, अन्याय, अत्याचाराचा हैदोस, पर्यावरणाचे बिघडलेले सूत्र, सदैव तहानलेली माती अन् नाती, राजकारणाला आलेले गुंडगिरीचे स्वरूप, संपत निघालेली देश-देवावरील निष्ठा आणि उद्याचे आक्राळ विक्राळ समाज जीवन यावर कवी अत्यंत संयमाने टोकदार भाष्य करतात. या साऱ्या पसाऱ्यात 'माणूस' शोधणे हा 'वानां' च्या कवितेचा मुख्य उद्देश आहे. दाही दिशात त्यांनी पाहिलेला माणूस गळलेला, आतून फाटलेला अन् माणूस म्हणूनच काळजापासून तुटलेला आहे. प्रत्येक माणूस या व्यवस्थेचा गुलाम आहे. सतत गुलामीत राहिल्यामुळेच त्याला त्या गुलामीचीच मौज वाटू लागते. हीच मौज कवी उपरोध आणि उपहासाने नोंदवितात.

त्यांच्या कवितेतील सामाजिकता गझलेच्या जरतारी वस्त्रावरील सुंदर


महाराष्ट्रातील
लोकचळवळी
संपादक : डॉ. सयाजीराजे मोकाशी



प्रा. चंद्रकांत पांडुरंग गायकवाड गौरवग्रंथ

# महाराष्ट्रातील लोकचळवळी

संपादक : डॉ. सयाजीराजे मोकाशी

नाग नालंदा प्रकाशन

नाग-नालंदा प्रकाशन

Maharashtratil Lokcalvali
Editor : Dr. Sayajiraje Mokashi

ISBN : 978-93-82451-69-3



**महाराष्ट्रातील लोकचळवळी**

**संपादक**
प्राचार्य डॉ. सयाजीराजे मोकाशी
कला व वाणिज्य महाविद्यालय,
मायणी, ता. खटाव, जि. सातारा
मोबा. : ९९२२४२१५९५

© सर्व हक्क सुरक्षित

**प्रकाशक**
त्र्यंबकेश्वर मिरजकर
नाग-नालंदा प्रकाशन
विशालनगर, मु. पो. इस्लामपूर,
ता. वाळवा, जि. सांगली.
मोबा. : ९८८१०३५८०३
Email : tbmirajkar76@gmail.com

**अक्षरजुळणी**
आयुष ग्राफीक्स, कोल्हापूर

**ग्राफीक्स**
विद्याधर कांबळे, हातकणंगले

**प्रथमावृत्ती**
२७ एप्रिल, २०१८

**मुद्रक**
लायन प्रिंटींग प्रेस, कोल्हापूर

मूल्य : ₹ २६० (दोनशे साठ रु. फक्त)

| | | |
|---|---|---|
| स्त्रीवाद चळवळ आणि महाराष्ट्र | प्रा. सौ. मेघा निकम | १४७ |
| संयुक्त महाराष्ट्र चळवळ | प्रा. सौ. सुरेखा देशमुख | १५३ |
| नवे जग घडवण्यासाठी - विद्रोही सांस्कृतिक चळवळ | कॉ. धनाजी गुरव | १६९ |
| प्रश्नांच्या तावडीत | सचिन माळी | १७७ |
| महाराष्ट्रातील शेतकरी चळवळ व सरकारचे धोरण | डॉ. अर्जुन गं. येरगे | १८१ |
| दलित चळवळ | प्रा. पूजा गायकवाड | १९४ |
| महाराष्ट्रातील सहकारी चळवळ - एक अवलोकन | प्रा. डॉ. अर्जुन पाटील | २०४ |
| सामान्य माणसाची चळवळ - संयुक्त महाराष्ट्र | प्रा. डॉ. दशरथ रा. देशिंगे<br>प्रा. डॉ. सविता अ. माळी | २१५ |
| निसर्गशेती चळवळ | प्रा. शरद श्रीरंग कदम | २२१ |
| मराठा आरक्षण चळवळ | प्रा. जी. आर. शिंदे | २२८ |
| या गदिमांच्या जन्मभूमीतील चळवळ... | प्रा. चंद्रकांत गायकवाड | २४१ |
| शेतकरी साहित्य इर्जिकची चळवळ | डॉ. सयाजीराजे मोकाशी | २४७ |
| पळशीगावच्या द्राक्षकुलाची प्रयोगशील चळवळ | प्रा. रावसाहेब पाटील | २५३ |
| शेतकऱ्यांचे लोकनेते : मा. आ. डॉ. गणपतरावजी देशमुख | शिवाजी बंडगर | २६१ |


## विभाग दोन


| | | |
|---|---|---|
| प्रा. चंद्रकांत गायकवाड : एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व | प्रा. देवकाते डी. बी.<br>प्रा. डॉ. अर्जुन येरगे | २६९ |
| मला भावलेले व्यासंगी, निगर्वी प्राध्यापक | प्रा. डॉ. प्रतापसिंह माने | २७३ |
| मोकळ्या मनाचा मोठा माणूस | प्रा. संभाजीराव गायकवाड | २७६ |
| जाणता समाजसेवक | श्री. गुलाब काटकर | २८० |
| पप्पा : एक आदर्श पिता | सौ. मनीषा निंबाळकर | २८३ |
| आमचे प्रेरणास्रोत - बापू | सौ. विद्या भोसले | २८५ |
| माझे विषय सहकारी | प्रा. एस. एस. काशिद | २८७ |
| एक ज्ञानसाधक गुरू | अतुल हसने | २९० |
| मी माझ्याशी... | प्रा. चंद्रकांत गायकवाड | २९३ |
| प्रा. चंद्रकांत पांडुरंग पाटील जीवनपट | | ३०३ |

# शेतकरी साहित्य इर्जिकची चळवळ

प्राचार्य डॉ. सयाजीराजे मोकाशी

भारतीय संस्कृतीत शेती आणि शेतकरी या दोन घटकांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. कारण प्रत्येक जिवाचे अन्न शेतीतूनच निर्माण होते. शेती म्हणजे नवनिर्मिती. जननक्षम शक्ती, बळीराजा, कुणबी, काश्तकार, कुणबाट अशा विविध नावांनी शेतकऱ्याला ओळखले जाते. शेती आणि शेतकरी यांचे वेगळेपण सांगताना डॉ. कृष्णा इंगोले म्हणतात की, कुटुंब, नातीगोती, जात, गावगाडा आणि परंपरा यांना धरून राहण्याची शेतकऱ्याची मानसिकता असते. मनाचा उदारपणा, श्रद्धाळूपणा, आशेवर जगणे, कमालीची सहनशक्ती आणि अपार कष्टाळूपणा ही त्याच्या जगण्याची वैशिष्ट्ये ठरतात. काळ्या जमिनीवर आणि दावणीतील जनावरांवर त्याचे जिवापाड प्रेम असते. असा हा शेतकरी भारतीय संस्कृतीत शतकानुशतके उपेक्षित राहिला व दुय्यम समजला गेला आहे. तर हाच शेतकरी मराठी साहित्यात कोठेतरी 'इरवाड' असा अभावानेच आढळतो.

अन्नब्रह्म निर्माण करणाऱ्या शेतकऱ्याचे दुःख समजून घेऊन, त्याला न्याय मिळवून द्यावा, त्याचा कष्टमय इतिहास त्याच्याच पिढीकडून लिहिला जावा, बळीराजाचे मराठी साहित्यातील भ्रामक चित्र पुसून टाकण्यासाठी त्याचे वास्तव जीवन समाजासमोर यावे यासाठी विसाव्या शतकाच्या शेवटी 'शेतकरी साहित्य इर्जिक (परिषद) महाराष्ट्र' या साहित्यिक सेवाभावी

संस्थेची आटपाडी, जि. सांगली येथे मुहूर्तमेढ रोवण्यात आली.

'शेतकरी साहित्य इर्जिक' हे शीर्षक मोठ्या कल्पकतेने योजनलेले आहे. पूर्वी समूहाने एकत्र येऊन, एखाद्या गरीब शेतकऱ्याची विनामोबदला जमीन कसणे किंवा कोणतेही कृषीकर्म करणे यालाच 'इर्जिक' म्हटले जात असे. पडीक जमीन नांगरणे, पिकांची काढणी, विहिरीचे काम करणे तसेच मोठ्या अवजड दगडांच्या ताली बांधणे इ. कामांसाठी बैल व मोठे मनुष्यबळ वापरावे लागत असे. पूर्वीच्या अनेक शेतकऱ्यांची हे काम करून घेण्याची ऐपत नसे. अशा प्रसंगी लोकांना व बैलजोड्यांना एकत्र करून मोठे काम केले जाई. आणि प्रेमाखातर गोड जेवण दिले जात असे किंवा काही भागात मांसाहारी जेवण देण्याची प्रथा असे. त्यास 'इरजे' म्हणण्याची पद्धत आहे. पाच-पन्नास बैलजोड्या व पाच-पंचवीस शेतकरी एखाद्या गरीब शेतकऱ्याची जमीन घटका दोन घटकांत नांगरून देत असत. या निरपेक्ष कामाची परतफेड जेवणाने केली. हे काम चालू असताना शेतकरी विविध सुंदर 'बैलगाणी' म्हणून उपस्थितांना आनंद देत असत.

संस्कृतमध्ये 'इरा' म्हणजे 'अन्न देणे' असा अर्थ आहे, तर कानडीत 'इरा' म्हणजे 'भूमी' तर अरबी भाषेत 'राजी करणे' असा अर्थ आहे. कानडीत 'इरा' म्हणजे मिळविणे, प्राप्त करणे, म्हणजेच एखादी वस्तू असणे व ती कष्टाने उत्पादशील बनविणे यास 'इर्जिक' म्हणता येईल. सदरच्या कामाला मोबदला नसल्याने, एवढे काम झालेच पाहिजे, असा आग्रह नसतो. हतबल, पतहीन गरीब शेतकऱ्याची जमीन विनामोबदला कसणे अथवा वहिवाटीखाली आणणे ही आमच्या संस्कृतीतील एक समानतेची चांगली परंपरा पिढ्यान्‌पिढ्या चालू आहे. परंतु चालू काळात 'इर्जिक'ची वैशिष्ट्यपूर्ण प्रथा बंद पडत निघाली आहे. तिचे साहित्यातून का होईना पुनरुज्जीवन करावे, नव्या जगातील शेतकऱ्याला समजून घ्यावे आणि शेतकऱ्यांच्याच मुलांनी आपल्या जुन्या परंपरांचा वास्तव इतिहास लिहावा. बहुजनांच्या शब्दांना मूल्य प्राप्त व्हावे अन् गावपंढरीत राहणाऱ्या प्रत्येक जिवाला आत्मविश्वासाने, सन्मानाने जगता यावे, यासाठीच 'शेतकरी साहित्य इर्जिक'चा संसार विचारपूर्वक मांडण्यात आला आहे.

पश्चिम महाराष्ट्रात १९८० सालापासून ग्रामीण भागात साहित्य संमेलने

संमेलन घेतले. माणदेशातील सर्व साहित्यिक, वाचक, साहित्यप्रेमी रसिकांना एकत्र करून एक नवा पायंडा पाडला. ग्रंथप्रदर्शन व विक्रीही होऊ लागली. डॉ. कृष्णा इंगोले यांची बहुतेक पुस्तक प्रकाशने माणदेशातच घडली. त्यानिमित्ताने इर्जिक परिवारातून मोठे जनजागृतीचे कार्य साध्य होताना दिसते.

माणदेशाबरोबरही अनेक ठिकाणी मोडनिंब, आंबाजोगाई, सोलापूर, पंढरपूर, श्रीपूर, अंकलखोप, आष्टा, वाळवा इ. अनेक ठिकाणी इर्जिकचे कार्य सुरू झाले. कवी नारायण सुमंत यांनी विदर्भात इर्जिकचा प्रचार व प्रसार केला. तेथेही काही शाखा शेतकऱ्यांचे प्रबोधन करतात.

■

27

स्मृतिशेष डॉ. सरिता पवार

# आठवणी आणि व्यक्तित्व

संपादक : डॉ. श्यामसुंदर मिरजकर



डॉ. सरिता पवार स्मृतिग्रंथ

स्मृतिशेष डॉ. सरिता पवार

# आठवणी आणि व्यक्तित्व

संपादक डॉ. श्यामसुंदर मिरजकर

डॉ. सरिता पवार स्मृतिग्रंथ

नाग-नालंदा
प्रकाशन

## अनुक्रम


■ संपादकीय प्रा. डॉ. श्यामसुंदर मिरजकर । ०७

१. बौद्ध परिभाषेत मृत्यूचे चिंतन डॉ. रवींद्र श्रावस्ती । १३

२. आमचे जीवनगाणे प्रा. एस. डी. पवार । १६

३. माझी मम्मी डॉ. विनोद पवार । २६

४. माझी आई व तिचा पी.एस.पी. डॉ. दीपा श्रावस्ती । ४०

५. मातृस्मृती डॉ. राहुल पवार । ५०

६. मम्मी : एक उमदे व्यक्तिमत्त्व डॉ. वैशाली पवार । ५४

७. प्रेम और संघर्ष का अतुलनीय संगम डॉ. हेमलता टम्टा-पवार । ६३

८. स्मृतिशेष होण्यापूर्वीच्या स्मृती डॉ. रवींद्र श्रावस्ती । ६५

९. खळाळती सरिता लोपली प्रा. डॉ. बाबुराव गुरव । ७५

१०. करुणेचा मूर्त अविष्कार प्रा. साहेबराव नितनवरे । ७९

११. आमच्या सरिता वहिनी डॉ. बी. एम. पाटील । ८३

१२. कथा एका सरितेची प्रा. डॉ. जे. एन. गायकवाड । ८५

१३. नि:शब्द निरासता प्रा. डी. एस. सुंगारे । ९०

१४. स्मरण प्रा. पी. आर. देशपांडे । ९३

१५. सायलीचा वेल प्रा. एस. एस. किट्टद । ९५

१६. डॉ. तानाजींची वहिनी डॉ. आनंदराव मोरे । ९९

१७. स्मृतिकुंज प्रा. दादासाहेब ढेरे । १०२

१८. सम्यक उत्कर्षाचे सहजरूप धनंजय झाकर्डे । १०४

१९. कार्यकर्त्यांची आई प्रा. डॉ. श्यामसुंदर मिरजकर । १०९

२०. स्मरण एका चैतन्याचे प्राचार्य डॉ. बळवंत साधू जाधव । ११२

# कार्यकर्त्यांची आई

डॉ. श्यामसुंदर मिरजकर

जगप्रसिद्ध रशियन कादंबरीकार मॅक्सिम गॉर्की याची 'आई' (The Mother - 1907) ही कादंबरी खूप गाजलेली आहे. जेव्हा रशियात क्रांतिप्रवण काळ होता, त्याच काळात ही कादंबरी प्रसिद्ध झाली. लेनिनने 'योग्य वेळी प्रकाशित झालेली कादंबरी' म्हणून या कादंबरीचा गौरव केला. या कादंबरीने कामगार-शेतकऱ्यांच्या क्रांतीला बळ दिले. कादंबरीचा नायक पावेल गुप्तपणे चळवळीत काम करतो आणि त्याची आई निलोवना ही नेहमी आपल्या मुलाच्या आणि त्यांच्या मित्राच्या कार्याला पाठबळ देत राहते. आपला एकुलता एक मुलगा तुरुंगात जाऊ शकतो किंवा बंदुकीच्या गोळीला बळी पडू शकतो याची जाणीव असूनही त्याला चळवळीसाठी प्रोत्साहन देणारी आई जगभर आदर्श ठरली, ते तिचे असामान्य साहस आणि स्वातंत्र्य-समानतेच्या मूल्यांवरील अढळ निष्ठेमुळे. त्यामुळेच ही आई माझ्याही मनात घर करून राहिली. अशी आई प्रत्यक्षात पहायला मिळेल असे कधी वाटले नव्हते. परंतु ज्या वेळी मी पहिल्यांदा डॉ. रवींद्र श्रावस्ती सोबत त्याचा मित्र डॉ. विनोदच्या घरी गेलो, त्यावेळी तिथे भेटलेली हसतमुख आई ही आगत्यशील होतीच, पण आपली मुले फुले-आंबेडकरी चळवळीचे काम करतात याचा आनंद असणारी आणि त्याला प्रोत्साहन देणारीही होती. मी मनात म्हणालो, ''मॅक्झिम गॉर्कीची आई निलोवना अशीच असली पाहिजे, डॉ. सरिता पवारांसारखी!''

मी मुळात बुजरा. इचलकरंजीतील कामगार कुटुंबाची पार्श्वभूमी असणारा.

25

# संतसाहित्यमीमांसा

## (भाषा, संप्रदाय आणि संशोधन)

संपादक
डॉ. ताहेर एच. पठाण
डॉ. न. ब. कदम



१३) नाथ संप्रदायाचा इतर संप्रदायांशी अनुबंध
- डॉ. अशोक देशमाने १६२

१४) संतसाहित्याची काव्यशास्त्रीय मीमांसा
- डॉ. शरदचंद्र देगलूरकर १६७

१५) सर्वज्ञ दासोपंत गोस्वामी : संप्रदाय आणि वाङ्मय
- डॉ. वैशाली गोस्वामी १८३

१६) संत एकनाथ चरित्रलेखनाची ऐतिहासिक मीमांसा
- डॉ. जॉन कुईनी १९७

## नवोदित अभ्यासक

१७) संतसाहित्याचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास
- डॉ. श्यामसुंदर मिरजकर २२०

१८) वारकरी संतांच्या रचनेतील औपनिषदिक सिद्धांत
- डॉ. श्याम नेरकर २३३

१९) तौलनिक साहित्याभ्यास आणि संतसाहित्य
- डॉ. ताहेर एच. पठाण २४७

२०) संतसाहित्यातील मूल्य शिक्षणाचे स्वरूप
- डॉ. न. ब. कदम २५८

२१) भारतीय संत कवयित्रींचे वाङ्मयीन कामगिरी
- मेधा जोशी २७५

२२) संतसाहित्यातील पर्यावरणीय जाणिवा
- ज्ञानेश्वर गाडे २९३

२३) केशवस्वामींची परंपरा आणि पदरचना
- काशी गायकवाड ३०८

२४) महानुभाव वाङ्मयातील स्त्रीविषयक दृष्टिकोन
- मंगल पठाडे ३२६

२५) संतांची अभंगवाणी आणि संगीत
- प्रणव बडवे ३३७

# १७.

# संतसाहित्याचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास


- डॉ. श्यामसुंदर मिरजकर

"संतसाहित्याचे दीर्घकालचे सातत्य, या साहित्याचा बहुजन समाजात झालेला प्रसार, या साहित्याची एकंदर व्याप्ती, खोली आणि परिमाणबहुलता लक्षात घेता, या साहित्याचा अद्यापि कितीतरी अंगांनी विचार होण्याची गरज आहे. (उदा. समाजशास्त्र, मानसशास्त्र, दैवतशास्त्र, लोकसंस्कृती, धर्मधरणा, तत्त्वज्ञान, मध्ययुगीन मराठी संस्कृती इ.) तो केल्याशिवाय संतसाहित्याच्या आकलनाच्या सर्व कक्षा आपल्या लक्षात येणार नाहीत."

**- गो. म. कुलकर्णी**

समाजशास्त्रीय समीक्षा हा साहित्याभ्यासाचा आधुनिक सिद्धांतव्यूह आहे. साहित्य हे एकाच वेळी विशिष्ट स्थळ-काळ-परिस्थितीशी बांधील असते तर त्याचवेळी ते स्थळकाळाची बंधने ओलांडून 'अक्षर' होण्याचे सामर्थ्य बाळगून असते. दर्जेदार साहित्य हे सार्वत्रिक आणि सर्वकालिक श्रेष्ठ गणले जाते. अशा साहित्याचा अभ्यास करताना साहित्यकृती निर्मितीचा काळ, साहित्यिक आणि त्यांच्या समकाळातील समाज-सांस्कृतिक स्थितीगती यांचा अभ्यास करणे गरजेचे ठरते. त्यातून विशिष्ट कलाकृती किंवा विशिष्ट साहित्यिक यांचे आकलन, आस्वादन, विश्लेषण, मूल्यमापन करणे शक्य होते. साहित्यकृती आणि समाज यांचा बहुपदरी अंत:संबंध उलगडण्यासाठी समाजशास्त्रीय समीक्षा साहाय्यभूत ठरते.

साहित्य आणि समाज यांचा व्यामिश्र सहसंबंध स्पष्ट करणे, हे समाजशास्त्रीय समीक्षेचे महत्त्वाचे कार्य आहे. अशा प्रकारचा पहिला अभ्यास मादाम जर्मेईन दी स्ताईन या फ्रेंच विदुषीने इ.स. १८०० मध्ये केला. तिने आपल्या ग्रंथात धर्म, चालीरिती, कायदा यांचा साहित्यावर कसा प्रभाव पडतो ते स्पष्ट केले. त्याद्वारे युरोपिअन साहित्यविश्वात प्रथमच एक नवा प्रभावी विचार चर्चिला गेला.


महाराष्ट्रातील
लोकचळवळी
संपादक : डॉ. सयाजीराजे मोकाशी
प्रा. चंद्रकांत पांडुरंग गायकवाड
गौरवग्रंथ



प्रा. चंद्रकांत पांडुरंग गायकवाड गौरवग्रंथ

# महाराष्ट्रातील लोकचळवळी

संपादक : डॉ. सयाजीराजे मोकाशी

नाग नालंदा प्रकाशन



**Maharashtratil Lokcalvali**
Editor : Dr. Sayajiraje Mokashi

ISBN : 978-93-82451-69-3

**महाराष्ट्रातील लोकचळवळी**

**संपादक**
प्राचार्य डॉ. सयाजीराजे मोकाशी
कला व वाणिज्य महाविद्यालय,
मायणी, ता. खटाव, जि. सातारा
मोबा. : ९९२२४२१५९५

© सर्व हक्क सुरक्षित

**प्रकाशक**
त्र्यंबकेश्वर मिरजकर
नाग-नालंदा प्रकाशन
विशालनगर, मु. पो. इस्लामपूर,
ता. वाळवा, जि. सांगली.
मोबा. : ९८८१०३५८०३
Email : tbmirajkar76@gmail.com

**अक्षरजुळणी**
आयुष ग्राफीक्स, कोल्हापूर

**ग्राफीक्स**
विद्याधर कांबळे, हातकणंगले

**प्रथमावृत्ती**
२७ एप्रिल, २०१८

**मुद्रक**
लायन प्रिंटींग प्रेस, कोल्हापूर

मूल्य : ₹ २६० (दोनशे साठ रु. फक्त)

| | | |
|---|---|---|
| स्त्रीवाद चळवळ आणि महाराष्ट्र | प्रा. सौ. मेघा निकम | १४७ |
| संयुक्त महाराष्ट्र चळवळ | प्रा. सौ. सुरेखा देशमुख | १५३ |
| नवे जग घडविण्यासाठी - विद्रोही सांस्कृतिक चळवळ | कॉ. धनाजी गुरव | १६९ |
| प्रश्नांच्या तावडीत | सचिन माळी | १७७ |
| महाराष्ट्रातील शेतकरी चळवळ व सरकारचे धोरण | डॉ. अर्जुन गं. येरगे | १८१ |
| दलित चळवळ | प्रा. पूजा गायकवाड | १९४ |
| महाराष्ट्रातील सहकारी चळवळ - एक अवलोकन | प्रा. डॉ. अर्जुन पाटील | २०४ |
| सामान्य माणसाची चळवळ - संयुक्त महाराष्ट्र | प्रा. डॉ. दशरथ रा. देशिंगे<br>प्रा. डॉ. सविता अ. माळी | २१५ |
| निसर्गशेती चळवळ | प्रा. शरद श्रीरंग कदम | २२१ |
| मराठा आरक्षण चळवळ | प्रा. जी. आर. शिंदे | २२८ |
| या गदिमांच्या जन्मभूमीतील चळवळ... | प्रा. चंद्रकांत गायकवाड | २४१ |
| शेतकरी साहित्य इर्जिकची चळवळ | डॉ. सयाजीराजे मोकाशी | २४७ |
| पळशीगावच्या द्राक्षकुलाची प्रयोगशील चळवळ | प्रा. रावसाहेब पाटील | २५३ |
| शेतकऱ्यांचे लोकनेते : मा. आ. डॉ. गणपतरावजी देशमुख | शिवाजी बंडगर | २६१ |


## विभाग दोन


| | | |
|---|---|---|
| प्रा. चंद्रकांत गायकवाड : एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व | प्रा. देवकाते डी. बी.<br>प्रा. डॉ. अर्जुन येरगे | २६९ |
| मला भावलेले व्यासंगी, निगर्वी प्राध्यापक | प्रा. डॉ. प्रतापसिंह माने | २७३ |
| मोकळ्या मनाचा मोठा माणूस | प्रा. संभाजीराव गायकवाड | २७६ |
| जाणता समाजसेवक | श्री. गुलाब काटकर | २८० |
| पप्पा : एक आदर्श पिता | सौ. मनीषा निंबाळकर | २८३ |
| आमचे प्रेरणास्रोत - बापू | सौ. विद्या भोसले | २८५ |
| माझे विषय सहकारी | प्रा. एस. एस. काशिद | २८७ |
| एक ज्ञानसाधक गुरू | अतुल हसबे | २९० |
| मी माझ्याशी... | प्रा. चंद्रकांत गायकवाड | २९३ |
| प्रा. चंद्रकांत पांडुरंग पाटील जीवनपट | | ३०३ |

# शेतकरी साहित्य इर्जिकची चळवळ

प्राचार्य डॉ. सयाजीराजे मोकाशी

भारतीय संस्कृतीत शेती आणि शेतकरी या दोन घटकांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. कारण प्रत्येक जिवाचे अन्न शेतीतूनच निर्माण होते. शेती म्हणजे नवनिर्मिती. जननक्षम शक्ती, बळीराजा, कुणबी, काश्तकार, कुणबाट अशा विविध नावांनी शेतकऱ्याला ओळखले जाते. शेती आणि शेतकरी यांचे वेगळेपण सांगताना डॉ. कृष्णा इंगोले म्हणतात की, कुटुंब, नातीगोती, जात, गावगाडा आणि परंपरा यांना धरून राहण्याची शेतकऱ्याची मानसिकता असते. मनाचा उदारपणा, श्रद्धाळूपणा, आशेवर जगणे, कमालीची सहनशक्ती आणि अपार कष्टाळूपणा ही त्याच्या जगण्याची वैशिष्ट्ये ठरतात. काळ्या जमिनीवर आणि दावणीतील जनावरांवर त्याचे जिवापाड प्रेम असते. असा हा शेतकरी भारतीय संस्कृतीत शतकानुशतके उपेक्षित राहिला व दुय्यम समजला गेला आहे. तर हाच शेतकरी मराठी साहित्यात कोठेतरी 'इरवाड' असा अभावानेच आढळतो.

अन्नब्रह्म निर्माण करणाऱ्या शेतकऱ्याचे दुःख समजून घेऊन, त्याला न्याय मिळवून द्यावा. त्याचा कष्टमय इतिहास त्याच्याच पिढीकडून लिहिला जावा. बळीराजाचे मराठी साहित्यातील भ्रामक चित्र पुसून टाकण्यासाठी त्याचे वास्तव जीवन समाजासमोर यावे यासाठी विसाव्या शतकाच्या शेवटी 'शेतकरी साहित्य इर्जिक (परिषद) महाराष्ट्र' या साहित्यिक सेवाभावी

संस्थेची आटपाडी, जि. सांगली येथे मुहूर्तमेढ रोवण्यात आली.

'शेतकरी साहित्य इर्जिक' हे शीर्षक मोठ्या कल्पकतेने योजनलेले आहे. पूर्वी समूहाने एकत्र येऊन, एखाद्या गरीब शेतकऱ्याची विनामोबदला जमीन कसणे किंवा कोणतेही कृषीकर्म करणे यालाच 'इर्जिक' म्हटले जात असे. पडीक जमीन नांगरणे, पिकांची काढणी, विहिरीचे काम करणे तसेच मोठ्या अवजड दगडांच्या ताली बांधणे इ. कामांसाठी बैल व मोठे मनुष्यबळ वापरावे लागत असे. पूर्वीच्या अनेक शेतकऱ्यांची हे काम करून घेण्याची ऐपत नसे. अशा प्रसंगी लोकांना व बैलजोड्यांना एकत्र करून मोठे काम केले जाई. आणि प्रेमाखातर गोड जेवण दिले जात असे किंवा काही भागात मांसाहारी जेवण देण्याची प्रथा असे. त्यास 'इरजे' म्हणण्याची पद्धत आहे. पाच-पन्नास बैलजोड्या व पाच-पंचवीस शेतकरी एखाद्या गरीब शेतकऱ्याची जमीन घटका दोन घटकांत नांगरून देत असत. या निरपेक्ष कामाची परतफेड जेवणाने केली. हे काम चालू असताना शेतकरी विविध सुंदर 'बैलगाणी' म्हणून उपस्थितांना आनंद देत असत.

संस्कृतमध्ये 'इरा' म्हणजे 'अन्न देणे' असा अर्थ आहे, तर कानडीत 'इरा' म्हणजे 'भूमी' तर अरबी भाषेत 'राजी करणे' असा अर्थ आहे. कानडीत 'इरा' म्हणजे मिळविणे, प्राप्त करणे. म्हणजेच एखादी वस्तू असणे व ती कष्टाने उत्पादशील बनविणे यास 'इर्जिक' म्हणता येईल. सदरच्या कामाला मोबदला नसल्याने, एवढे काम झालेच पाहिजे, असा आग्रह नसतो. हतबल, पतहीन गरीब शेतकऱ्याची जमीन विनामोबदला कसणे अथवा वहिवाटीखाली आणणे ही आमच्या संस्कृतीतील एक समानतेची चांगली परंपरा पिढ्यान्‌पिढ्या चालू आहे. परंतु चालू काळात 'इर्जिक'ची वैशिष्ट्यपूर्ण प्रथा बंद पडत निघाली आहे. तिचे साहित्यातून का होईना पुनरुज्जीवन करावे. नव्या जगातील शेतकऱ्याला समजून घ्यावे आणि शेतकऱ्यांच्याच मुलांनी आपल्या जुन्या परंपरांचा वास्तव इतिहास लिहावा. बहुजनांच्या शब्दांना मूल्य प्राप्त व्हावे अन् गावपंढरीत राहणाऱ्या प्रत्येक जिवाला आत्मविश्वासाने, सन्मानाने जगता यावे, यासाठीच 'शेतकरी साहित्य इर्जिक'चा संसार विचारपूर्वक मांडण्यात आला आहे.

पश्चिम महाराष्ट्रात १९८० सालापासून ग्रामीण भागात साहित्य संमेलने

संमेलन घेतले. माणदेशातील सर्व साहित्यिक, वाचक, साहित्यप्रेमी रसिकांना एकत्र करून एक नवा पायंडा पाडला. ग्रंथप्रदर्शन व विक्रीही होऊ लागली. डॉ. कृष्णा इंगोले यांची बहुतेक पुस्तक प्रकाशने माणदेशातच घडली. त्यानिमित्ताने इर्जिक परिवारातून मोठे जनजागृतीचे कार्य साध्य होताना दिसते.

माणदेशाबरोबरही अनेक ठिकाणी मोडनिंब, आंबाजोगाई, सोलापूर, पंढरपूर, श्रीपूर, अंकलखोप, आष्टा, वाळवा इ. अनेक ठिकाणी इर्जिकचे कार्य सुरू झाले. कवी नारायण सुमंत यांनी विदर्भात इर्जिकचा प्रचार व प्रसार केला. तेथेही काही शाखा शेतकऱ्यांचे प्रबोधन करतात.

■

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार"
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

# हिंदी और मराठी संत साहित्य की समाज प्रबोधन में भूमिका

संपादक

**डॉ. भरत सगरे**

सह संपादक

**डॉ. विठ्ठल नाईक**







श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापुर संचलित

**लाल बहादुर शास्त्री कॉलेज ऑफ आर्टस्, सायन्स अ‍ॅण्ड कॉमर्स, सातारा**

| | | |
|---|---|---|
| महात्मा कबीर के विचारों की प्रासंगिकता | प्रा. डॉ. एस. बी. तांबोळी | 165 |
| संत कबीर का समाज प्रबोधन | डॉ. शहनाज सय्यद | 169 |
| कबीर की गुरु महिमा | प्रा. महेश भोपळे, प्रा. राजेंद्र शिंगटे | 172 |
| संत कबीर का समाज प्रबोधन में योगदान | प्रा. शुभांगी निकम | 178 |
| संत कबीर का समाज प्रबोधन में योगदान | प्रा. सविता मेनकुदळे | 182 |
| संत कबीर के साहित्य में चित्रित समाज प्रबोधन की दिशाएँ | प्रा. डॉ. मनिषा जाधव | 186 |
| निर्गुण संत नामदेव के काव्य में समाज प्रबोधन | प्रा. सुवर्णा कांबळे | 190 |
| निर्गुण भक्ति काव्य का सामाजिक पक्ष | डॉ. नाजिम शेख | 196 |
| मध्यकालीन संत रविदास के सामाजिक विचारों की प्रासंगिकता | शुभांगी हेगडे/रेणुका गाडे<br>मोहिनी पिसाळ / भारती वाघमारे | 199 |
| मराठी संतों के हिंदी वाणियों में सामाजिक मूल्य | प्रा. मालोजी जगताप | 202 |
| कबीर का समाज प्रबोधन में योगदान | डॉ. सुब्राव जाधव | 206 |
| संत साहित्य : स्वरुप एवं महत्त्व | डॉ. चेतनकुमार मोदी | 209 |
| संत रैदास का समाज सुधार में योगदान | प्रा. गोरख बनसोडे | 215 |
| संत साहित्य में सामाजिक प्रबोधन | प्रा. नीता साठे/प्रा. सुनील काकडे | 219 |
| सामाजिक पाखंडता के विरोधक -संत कबीर | प्रा. दिलीप भोसले | 222 |
| संत साहित्य की प्रासंगिकता | प्रा. डॉ. मल्हारी मसलखांब | 226 |
| संत नामदेव की हिंदी वाणी और सामाजिक प्रदेयता | शमा मन्यार/वर्षा बाबर<br>विद्या सुरवसे / रुपाली सुरवसे | 231 |
| संत साहित्य की प्रासंगिकता (मराठी संतों के संदर्भ में) | शशिकांत वेदपाठक / प्रविण शिंदे<br>इंद्रजीत आलदर/गणेश शिनगारे | 234 |
| वर्तमान समाज प्रबोधन में संत कबीर की प्रासंगिकता | डॉ. के. ए. पाटील | 237 |
| हिंदी निर्गुण संत साहित्य एवं समाज प्रबोधन | डॉ. जितेंद्र बनसोडे | 241 |
| समाजसुधारक कबीर | प्रा. एन. ए. चव्हाण | 245 |
| हिंदी निर्गुण संत साहित्य एवं समाज प्रबोधन - समाजसुधारक कबीर | डॉ. सविता नाईक निंबाळकर | 248 |
| संत साहित्य और उसका महत्व | दादासो देवकाते/हर्षवर्धन पाटील<br>संतोष साळुंखे/अजय साळुंखे | 251 |
| जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती | डॉ. यशवंत पाटणे | 253 |
| वारकरी संत साहित्य, निर्गुणवाद आणि समाजप्रबोधन | डॉ. श्यामसुंदर मिरजकर | 257 |

# वारकरी संत साहित्य, निर्गुणवाद आणि समाजप्रबोधन

- डॉ. श्यामसुंदर मिरजकर
मराठी विभाग, कला, वाणिज्य महाविद्यालय, मायणी (खटाव)

मराठी साहित्याचा प्रारंभकाल हा विविध भक्तिसंप्रदायातील महनीय प्रज्ञावंतांनी केलेल्या बहुविध रुपातील साहित्यकृतींनी नटला आहे. साधारणतः बाराव्या शतकापासून मराठीतील महत्वपूर्ण साहित्यनिर्मितीला सुरुवात झाली. नाथ, महानुभाव, वारकरी आणि समर्थ संप्रदायांनी मराठीत साहित्यनिर्मिती करून मराठीचा प्रारंभकाल समृद्ध केला आहे.

**मध्ययुगीन संतसाहित्य : अध्यात्मिक बंडखोरी–**

कल्याणीचे चालुक्य (इ.स. ९७३ ते ११५०),मंगळवेढ्याचे कळचुरी(इ. स. ११५० ते ११८३), देवगिरीचे यादव (इ. स. ११८३ ते १३१६), खिलजी (इ. स. १३१६ ते १३२५) आणि तुघलक (इ.स. १३२५ ते १३५१) अशा विविध राज्यकर्त्यांनी या काळात महाराष्ट्रावर राज्य केले. या काळात वैदिकांनी वर्णाश्रम व्यवस्थेला, यजन-याजन, व्रते-उद्यापन यांना अतोनात महत्त्व दिले होते. जातिव्यवस्था उग्र स्वरुपात कार्यरत होती. स्त्रिया, शूद्र व अस्पृश्य अतिशूद्रांना अनेक अधिकारांपासून वंचित ठेवून सेवादास्य करण्यास बाध्य केले होते. त्याचवेळी बहुजन समाजात अनेक शूद्र देवदेवतांना महत्त्व आले होते. कनोजचा मंत्री लक्ष्मीधर याने 'कृतकल्पतरू'(इ. स. ११७५) आणि देवगिरीचा प्रधान 'चतुर्वर्ग-चिंतामणी' (इ. स. १२७५) हे व्रतकोश निर्माण केले. एका वर्षात करावयाच्या सुमारे २००० व्रतांची माहिती यात होती. परिणामी हा काळ वैदिक वर्चस्ववादाचा आणि बहुजनांच्या अनिष्ठ प्रथा-परंपरांचा होता. अशा संधीकाळात नाथ संप्रदाय (११ वे शतक), लिंगायन संप्रदाय (१२वे शतक), महानुभाव संप्रदाय (१३ वे शतक) यांची प्रस्थापना अनुक्रमे गोरक्षनाथ, बसवेश्वर, चक्रधर व नामदेव यांनी केली. हे सगळे संप्रदाय म्हणजे तत्कालिन धार्मिक व्यवस्थेविरुद्धचे बंड होते. या सर्वांनी वेदप्रामाण्य नाकारुन स्वतःची स्वतंत्र उपासना पद्धती सुरू केली. लेखन-

वाचन, पौराहित्य, धर्मकथन यातील वैदिक ब्राह्मणाची मक्तेदारी मोडून काढली. 'सकळासी येथे आहे अधिकार' असा पुकारा केला.

बसवेश्वरांच्या लिंगायत संप्रदायात कक्कय्या, हरळय्या, अक्कमहादेवी अशा अस्पृश्य व स्त्रियांना सन्मानाचे स्थान मिळाले. त्यांनी 'वाचन साहित्य' रचले. कन्नड या लोकभाषेचा स्वीकार केला. महानुभवांनी मराठीतून ग्रंथनिर्मिती करून पंचकृष्ण ही कल्पना स्वीकारली. स्वतःचे वेगळे आचारविश्व निर्माण केले. त्यासाठी 'लीळाचरित्र', 'श्री गोविंदप्रभू चरित्र', 'स्मृतिस्थळ', 'सूत्रपाठ', 'वृद्धाचार' असे ग्रंथ रचले. महदंबेने 'धवळे' हे काव्य रचले. परंपरेपेक्षा वेगळी उपासना सांगून बंडखोरी केली. स्वतःच्या सकळा, सुंदरी अशा गुप्त लिप्या तयार केल्या.

वारकऱ्यांनी सगळ्या शूद्र, अतिशूद्रांना एका ध्वजेखाली आणले. 'नाही यातिकूळ उंच नीच भेद। भाव एक शुद्ध पाहातसे' अशी घोषणा नामदेवांनी केली. चोखामेळा, बंका सारखे अत्यंज, जनाबाईसारखी दासी, अगदी कान्होपात्रासारखी गणिका या संप्रदायात संत म्हणून प्रतिष्ठित होऊ शकली. हे सगळे परंपराविरोधी होते, पाखंड होते. म्हणून ज्ञानदेवांपासून तुकारामापर्यंत प्रत्येक संतांचा छळ झाला. असे असले तरी 'आम्हां सापडले वर्म। करू भागवत धर्म।।' म्हणत समतेची पताका हाती धरून संत नामदेवांनी पंढरपूरापासून पंजाबपर्यंत सर्वत्र भक्तीची, अभिव्यक्तीची चळवळ उभी केली. या अर्थाने मध्ययुगातील हे संप्रदाय म्हणजे सनातनी वैदिकांच्या विरोधातली बंडखोरी असेच म्हणावे लागेल.

**निर्गुणोपासनेचा उगप उपनिषदात –**

वैदिक वाङ्मयात क्रमाने वेद, ब्राह्मण नावाचे ग्रंथ, आरण्यक नावाचे ग्रंथ आणि उपनिषदे यांचे महत्त्व आहे. उपनिषदांची संख्या २०० हून अधिक असली तरी त्यापैकी दहा उपनिषदे महत्त्वाची मानली जातात. या उपनिषदांनाच वेदान्त असेही म्हणतात. वेदांत अनेक देव-देवतांचा उल्लेख आहे आणि वेदाची यज्ञसंस्कृती ही काम्य आहे. याउलट उपनिषदांनी अद्वैताची मांडणी केली. ब्रह्म किंवा परमेश्वर याला सर्वोच्च स्थान दिले. उपनिषदे ही परा विद्या आहे. त्यामध्ये अष्टांगयोग, परमेश्वराचे स्वरूप, राजयोग, कर्मयोग, ज्ञानयोग, भक्तियोग यांचा समावेश होतो. निर्गुणोपासनेचे तत्त्वज्ञान आपणांस 'मुण्डकोपनिषदात' पहावयास मिळते.

यत् तद अद्रेश्यं अग्राह्यं अगोत्रं अवर्ण
अचक्षुःश्रोत्रम् तत् अपाणिपादम्।